**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर, वाढवण बंदरासह विविध विकासकामांचा करणार प्रारंभ
- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी
- भारतीय स्टार्ट अप्सना जागतिक भांडवल सहजपणे उपलब्ध होण्यासाठी रोखे करार नियमन कायद्यात अर्थ मंत्रालयाकडून सुधारणा

**आणि**

- शेअर बाजारात तेजी, सेन्सेक्स आणि निफ्टी सार्वकालिक उंचीवर

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते सकाळी ११ वाजता मुंबईतल्या जिओ कन्व्हेंशन सेंटरमध्ये ग्लोबल फिन्टेक फेस्टचं उद्घाटन करणार आहेत. पेमेंटस कौन्सिल ऑफ इंडिया, नॅशनल पेमेंटस कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि फिनटेक कन्व्हर्जन्स कौन्सिल यांनी हा महोत्सव आयोजित केला आहे. त्यानंतर सुमारे दीडच्या सुमाराला पालघरच्या सिडको मैदानावर त्यांच्या हस्ते विविध विकासकामांचं उद्घाटन आणि भूमिपूजन होणार आहे. पालघर इथं डहाणू गावात ते ७६ हजार कोटी रूपयांच्या वाढवण बंदराचं भूमिपूजन करणार आहेत.

प्रधानमंत्री एक हजार ५६० कोटी रुपयांच्या २१८ मत्स्यपालन प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणीही करणार आहेत. त्यामुळे देशभरात या क्षेत्रात पाच लाख रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यांच्या हस्ते ३६० कोटी रूपयांच्या नौका संपर्क प्रणालीचं उद्घाटन होईल. ही प्रणाली इस्रोनं विकसित केली आहे. त्यामुळे समुद्रात गेलेल्या मच्छिमारांशी संपर्क साधता येणार असून त्यांच्या

सुरक्षेची हमी मिळणार आहे. मासेमारी बंदर, एकात्मिक ॲक्वा पार्क अशा प्रकल्पांचंही उद्घाटन ते करतील.

**<><><><><>**

वाढवण बंदर महाराष्ट्रासोबत देशाची वेगळी ओळख निर्माण करायला मदत करेल असा विश्वास केंद्रीय बंदर, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज व्यक्त केला. वाढवण बंदराचं उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ते पालघर इथं आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते.

आशिया खंडातलं हे सर्वात मोठं बंदर असेल आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरामध्ये याचा समावेश होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या बंदरामुळे १२ लाख लोकांना प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरीत्या रोजगार मिळेल, असं सोनोवाल यांनी सांगितलं.

स्थानिकांशी चर्चा करून राज्य सरकारच्या नियमांनुसार त्यांना मोबदला दिला जाईल तसंच रोजगारासाठी आवश्यक कौशल्यं स्थानिक युवकांना शिकवली जातील, अशी माहिती केंद्रीय बंदर, जलमार्ग आणि नौवहन, सचिव टी. के. रामचंद्रन यांनी दिली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. ६ जिल्ह्यांमधल्या २६ मतदारसंघांमधे या टप्प्यात निवडणूक होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज आजपासून येत्या ५ सप्टेंबरपर्यंत  भरता येतील. अर्जांची छाननी येत्या ६ सप्टेंबरला होणार असून उमेदवारी मागे घेण्याची मुदत ९ सप्टेंबरपर्यंत आहे. येत्या २५ सप्टेंबरला मतदान होणार आहे. सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या वांद्रे टर्मिनस पासून मडगावला जाणारी नवी एक्सप्रेस गाडी आजपासून सुरू झाली. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी या गाडीला हिरवा झेंडा दाखवून ही गाडी रवाना केली. या कार्यक्रमाला रेल्वे , माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव हे दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. मुंबईत रेल्वेचे एकूण १६ हजार २४० कोटी रुपयांचे प्रकल्प झाल्यानं सर्व मुंबईकरांना त्याचा लाभ होईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

भारत स्टार्टअप उद्योगांची मांदियाळी असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्य मंत्री जितिन प्रसाद यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत डिजिटल भारत इकॉनॉमी कॉन्क्लेव्हला ते संबोधित करत होते. ते म्हणाले की गेल्या १० वर्षात दर ४० मिनिटांनी एक या वेगानं स्टार्टअप उद्योग देशात सुरु झाले आहेत. एकूण एक लाख ४० हजार स्टार्टअप्स पैकी किमान ४५ टक्के उद्योगांचं नेतृत्व महिलांकडे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्र विधान मंडळातल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे दिल्या जाणाऱ्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातल्या उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण या पुरस्कारांचं वितरण ३ सप्टेंबर रोजी मुंबईत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. सन २०१९ ते २०२४ या कालावधीसाठी हे पुरस्कार दिले जातील. यावेळी वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व या ग्रंथाचं प्रकाशन देखील करण्यात येईल, अशी माहिती विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज दिली. सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप असेल. या समारंभाला

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थ मंत्रालयानं एससीआरआर, अर्थात रोखे करार नियमन कायदा १९५६ मध्ये सुधारणा केली आहे. आयएफएससी अर्थात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रांच्या अखत्यारितल्या आंतरराष्ट्रीय शेअर बाजारांमध्ये जागतिक मानकांनुसार सूचीबद्ध होण्याची इच्छा असलेल्या भारतीय कंपन्यांकरता प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ही सुधारणा केली आहे. भारतातल्या सार्वजनिक कंपन्यांचे प्रस्ताव आणि वितरण, भांडवलाच्या किमान १० टक्के इतकं असणं बंधनकारक असणार आहे. मर्यादा कमी केल्यानं, देशातल्या उदयोन्मुख कंपन्या तसंच तंत्रज्ञान क्षेत्रातल्या भारतीय स्टार्ट अप्सना सुलभतेनं जागतिक भांडवल उपलब्ध होऊ शकणार आहे.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारात आज सेन्सेक्स आणि निफ्टीने या सत्रातला सार्वकालिक उच्चांक गाठला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ३४९ अंकाची वाढ झाली आणि तो ८२ हजार १३५ अंकांवर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत आज १०० अंकांची वाढ झाली आणि तो २५ हजार १५२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

पॅरिस इथं सुरू असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत आज बॅडमिंटनच्या महिला एकेरीत पलक कोहलीनं सलामीच्या सामन्यात फ्रान्सच्या मिलेना सूरीऊचा सलग दोन गेममध्ये पराभव केला, तर अव्वल मानांकित नीतेश कुमारनं टोक्यो कांस्य पदक विजेत्या मनोज सरकारचा पराभव केला. अव्वल मानंकित टी. मुरूगेसन हिनं रोझा मार्कोचा पराभव केला. तिरंदाजी स्पर्धेच्या वैयक्तिक गटात शीतल देवी हिनं

मानांकन फेरीत दुसरा क्रमांक पटकावला, तर सरिताला नवव्या क्रमांकावर समाधान मानावं लागलं.

<><><><><>

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा होत आहे. केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदानावर ध्यानचंद यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. सर्वांनी आपापल्या रोजच्या कामातून वेळ काढून किमान एक तास काढून, आपल्या आवडीचा एक खेळ खेळावा, असं आवाहन मांडवीय यांनी केलं .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त समाजमाध्यमांवर दिलेल्या संदेशात, मेजर ध्यानचंद यांना अभिवादन केलं आहे. खेळाबद्दल आत्मियता बाळगणाऱ्या आणि क्रीडाक्षेत्रात देशाचं नाव उंचावणाऱ्या सर्वांचं कौतुक करण्याचा हा दिवस असल्याचं ते म्हणाले. अधिकाधिक युवकांना खेळण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पडल्याप्रकरणी कुणालाही माफी नाही, कारवाई होणारच, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते आज बीड इथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेत बोलत होते. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होईल, असं त्यांनी सांगितलं.

पुतळा कोसळण्यामागची कारणं शोधण्यासाठी संयुक्त तंत्रज्ञ समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल घेतला. या समितीत बांधकाम अभियंते, आयआयटी मुंबईचे प्रतिनिधी, तसंच नौदलाच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. याखेरीज राजकोटमधेच शिवरायांचा भव्य पुतळा नव्यानं उभारण्यासाठी देशातले

नामवंत शिल्पकार, अभियंते, तज्ज्ञ आणि नौदलाचे प्रतिनिधी यांची तज्ज्ञ समिती नेमण्याचे आदेशही त्यांनी दिले.

पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ काल आयोजित निषेध मोर्चाच्यावेळी दोन गटांमधे झालेल्या संघर्ष प्रकरणी ४२ जणांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र हे देशाचं विकास इंजिन असून गेल्या दोन वर्षात महाराष्ट्राचा जीडीपीतला वाटा सर्वाधिक आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. ते खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत बोलत होते. आपलं सरकार रात्रंदिवस काम करत असून घरात बसून सरकार चालवता नाही येत, त्यासाठी जनतेशी संपर्कात राहिलं पाहिजे, असं ते म्हणाले. राज्याची एक ट्रिलियनची अर्थव्यवस्था असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य सरकार उपाययोजना करतं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**